# प्रेसनोट

दि.३०/११/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | लोणी पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | धनंजय गोरख आगरे, वय—२८ वर्ष, बाहयस्त्रोत वायरमन, म.रा.वि.वि. कंपनी बाभळेश्वर सेक्शन, ता.राहाता, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी राजुरी येथे नव्याने बेकरी सुरु केली असून त्यासाठी व्यावसायिक वीज जोडणी घेतली आहे. सदर वीज जोडणीसाठी आवश्यक असलेले नवीन विद्युत मीटरसाठी अधिकृत कोटेशन व शुल्क भरले आहे. ते मीटर लावुन देणेकरीता यातील आरोपी लोकसेवक धनंजय गोरख आगरे, वय—२८ वर्ष, बाहयस्त्रोत वायरमन, नेमणुक म.रा.वि.वि. कंपनी बाभळेश्वर सेक्शन, ता.राहाता, जि.अहमदनगर याने तक्रारदार यांचेकडे २०००/— रुपये लाचेची मागणी केल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन आज दि.३०/११/२०२२ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली असता सदर लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान पंचासमक्ष आरोपी लोकसेवक धनंजय गोरख आगरे याने तक्रारदार यांचेकडे २०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोड अंती १०००/— रुपये लाचेची मागणी केली व सदर लाच रक्कम आरोपी लोकसेवक आगरे याने आज दि.३०/११/२०२२ रोजी राजुरी येथे आयोजित केलेल्या सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडुन स्वीकारली असता आरोपी लोकसेवक आगरे यास रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत लोणी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :— ९९३०९९७७००


(हरीश खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर